आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.००वाजता

२३डिसेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून तरूणांना सक्षम बनवण्याला केंद्र सरकार महत्व देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त आज देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन
- उत्तर प्रदेशातल्या पिलभीत जिल्ह्यात आज सकाळी पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत तीन खलिस्तानी अतिरेकी ठार

**आणि**

- पुण्यात भरधाव डंपरने चिरडल्यामुळे ३ जणांचा मृत्यू, ६ जण गंभीर जखमी

**<><><><><>**

तरूणांच्या क्षमता आणि कलागुणांचा पूरेपूर वापर करून या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून तरूणांना सक्षम बनवण्याला केंद्र सरकार प्राधान्य देत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून रोजगार मेळाव्याला संबोधित करत होते. देशभरात ४५ ठिकाणी असे रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले असून गृह मंत्रालय, टपाल कार्यालय, उच्च शिक्षण विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग यांसारख्या विविध मंत्रालयांमध्ये ७१ हजारांहून अधिक नियुक्तीपत्राचं वाटप करण्यात आलं.

मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत अभियान, स्टार्टअप इंडिया, स्टँड अप इंडिया, डिजिटल इंडियासारख्या योजनाही युवांना केंद्रस्थानी ठेवून बनवण्यात आल्या असल्याचं प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. या रोजगार

धोरणांमुळं ग्रामीण भागांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत असल्याचंही ते यावेळी म्हणाले. महाराष्ट्रात केंद्रीय मंत्री नितिन गडकरीं यांनी नागपूरमध्ये आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यामध्ये युवकांना नियुक्तीपत्रांचं वाटप केलं. आयुष्यामध्ये प्रामाणिकपणा, विश्वसार्हता आणि पारदर्शकता ही क्षमता आहे. शासकीय नोकऱ्यांमध्ये नवनियुक्तांनी आपल्या अंगभूत तसेच व्यक्तिगत कौशल्याचा विकास करून केवळ नोकरी मागणारे नव्हे तर नोकरी देणारे व्हावे असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूरच्या केंद्रीय राखीव पोलीस दल ग्रुप सेंटर हिंगणा येथे आयोजित रोजगार मेळाव्यात केल. यावेळी २५७ जणांना नियुक्तीपत्र वितरित करण्यात आलं. पुण्यात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत झालेल्या रोजगार मेळाव्यात ५०० जणांना नियुक्तीपत्रं प्रदान करण्यात आली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत नाताळ उत्सवात सहभागी होणार आहेत. भारतीय कॅथोलिक बिशप्स परिषदेतर्फे या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी ख्रिस्ती समाजाचे प्रमुख नेते, चर्चचे कार्डिनल्स आणि बिशप्स यांच्याशी प्रधानमंत्री चर्चा करतील. कॅथोलिक चर्चच्या मुख्यालयातील प्रधानमंत्र्यांचा हा पहिलाच कार्यक्रम आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त आज देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. देशाची प्रगती आणि विकासामध्ये शेतकऱ्यांच महत्व आणि भागिदारी अधोरेखित करणं, अन्न सुरक्षा, शाश्वत ग्रामीण अर्थव्यवस्था

आणि कृषी परंपरा जपण्यासाठी शेतकऱ्यांचं योगदान कसं महत्वाचं आहे यासाठी आजचा दिवस साजरा केला जातो. शेतकऱ्यांची महत्त्वाची भूमिका ओळखून सरकारने त्यांच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी आणि शाश्वत कृषी विकासासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. देशात यंदा विक्रमी ३३२ दशलक्ष टनापेक्षा जास्त अन्नधान्याचं उत्पादन झाले आहे.

**<><><><><>**

कृषी क्षेत्र ग्रामीण विकासाचा कणा असून ग्रामीण भागातील शेतकरी आणि शेतकऱ्यांचं कुटुंब सर्व बाबतीत जोपर्यंत सक्षम होत नाही तोपर्यंत देश विकसित राष्ट्र होऊ शकणार नाही असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड म्हणाले. नवी दिल्लीत चौधरी चरणसिंग २०२४ या पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी माजी प्रधानमंत्री चौधरी चरणसिंह यांनी शेतकऱ्यांसाठी आणि ग्रामीण भागासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली. तसंच भारत हा सध्या जगातील पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून जपान आणि जर्मनीनंतर तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर असल्याचंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या पिलभीत जिल्ह्यात आज सकाळी खलिस्तानी अतिरेकी आणि पोलिसांच्या चकमकीत तीन अतिरेकी ठार झाले. हे तिन्ही खलिस्तानवादी अतिरेकी १९ डिसेंबर रोजी पंजाबच्या गुरुदासपूर जिल्ह्यातल्या एका पोलीस चौकीवर झालेल्या हातबॉम्ब हल्ल्यात सहभागी होते. पिलभीत जवळच्या भागात खलिस्तानवादी अतिरेकी असल्याची

माहिती मिळाल्यानंतर पंजाब आणि उत्तर प्रदेश या दोन्ही राज्याच्या पोलिसांनी संयुक्तपणे शोधमोहिम सुरु केली. पोलिसांनी त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी गोळीबार सुरु केला. प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी केलेल्या गोळीबारात तीन दहशतवादी ठार झाले. खलिस्तानी कमांडो फोर्सशी संबंधित असलेल्या या अतिरेक्याकडून पिस्तुलही जप्त केली.

**<><><><><>**

पुण्यात फूटपाथवर झोपलेल्या ९ जणांना भरधाव डंपरने चिरडल्याने ३ जणांचा जागीच मृत्यू झाला तर सहा जण गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये दोन बालकांचा समावेश आहे. डंपर चालकाचं डंपरवरील नियंत्रण सुटल्यानं हा अपघात झाला. ही घटना पुणे शहरातल्या वाघोली चौक परिसरात काल मध्यरात्री घडली. मोटार वाहन कायदा आणि आणि भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांखाली डंपर चालकाला अटक करण्यात आली आहे. डंपरचा चालक हा दारूच्या नशेत गाडी चालवत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या अपघातात जखमी झालेले सर्वजण कामगार असून ते काल रात्रीच अमरावतीमधून पुण्यात आले होते.

**<><><><><>**

आयुर्वेदिक औषधांच्या नावाखाली भांगेच्या गोळ्यांची तस्करी करणाऱ्या जितेंद्र कामताप्रसाद जैस्वाल याला राज्य उत्पादन शुल्क विभागाने भाईंदरमधून अटक केली आहे. त्याच्याकडून दोन लाखांहून अधिक रुपयांच्या भांगेच्या गोळ्यांचा साठा जप्त करण्यात आला आहे. हा साठा उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश राज्यातून रेल्वेने ठाणे, पालघरमधल्या पान

टपऱ्यांवर विक्रीसाठी आणल्याचा राज्य उत्पादन शुल्क विभागाचा अंदाज आहे.

<><><><><>

धुळे शहरातील एका लॉज मधून चौघा बांगलादेशी नागरीकांना आज पोलिसांनी ताब्यात घेतलं. वैध कागदपत्राशिवाय बेकायदेशिररित्या हे चार जण राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. यात तीन महिला आणि एका पुरुषाचा समावेश आहे. या चौघांविरोधात आझादनगर पोलीस ठाण्यात परकीय नागरिक कायद्यान्वये गुन्हा दाखल केल्याची माहिती पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिली.

<><><><><>

नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरील नवीन धावपट्टीच्या कामात होत असलेल्या विलंबाबद्दल केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हे काम एका महिन्याच्या आत पूर्ण न केल्यास कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी कंत्राटदार कंपनीला दिला आहे.

नव्या धावपट्टीच्या कामाची निविदा गेल्या वर्षी डिसेंबर मध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर यावर्षी १ मे रोजी के. जी. गुप्ता कंपनीला या कामाचे कार्यादेश देण्यात आले. अद्याप हे काम पूर्ण न झाल्याच्या तक्रारी त्यांच्याकडे आल्या होत्या, त्यावर त्यांनी हे आदेश दिले आहेत. हे काम २१ मे २०२५ पर्यंत पूर्ण होईल असे कंपनीतर्फे सांगण्यात आले आहे.

<><><><><>

पाकिस्तान क्रिकेट मंडळानं २०२५च्या आयसीसी चँपियन्स करंडक स्पर्धेतील भारताच्या सामन्यांसाठी, तटस्थ स्थळ म्हणून संयुक्त अरब अमिरात या देशाची निवड केली आहे. सुरक्षाविषयक कारणांमुळे भारतानं पाकिस्तानमध्ये खेळण्यास नकार दिल्यामुळे पाकिस्ताननं हा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे भारताचे सर्व सामने आता संयुक्त अरब अमिरातीमध्ये खेळले जाणार आहेत. त्या देशात कोणत्या ठिकाणी हे सामने होणार हे पाकिस्तान क्रिकेट मंडळानं स्पष्ट केलं नसलं, तरी दुबईमध्ये हे सामने होतील, अशी शक्यता आहे. पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या या निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद म्हणजे आयसीसीसाठी स्पर्धेचं वेळापत्रक निश्चित करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

**<><><><><>**

विजय हजारे करंडक स्पर्धा सुरू असून आज अहमदाबाद इथे मुंबई विरुद्ध हैदराबाद संघांचा सामना सुरू आहे. मुंबई संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. हैदराबाद संघाने सर्वबाद १६९ धावा केल्या आहेत. मुंबई अथर्व अंकोलेकर याने चार तर आयुष म्हात्रे याने तीन गडी बाद केले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा मुंबई संघाच्या २३ षटकांत ७ बाद १४१ धावा झाल्या होत्या.

***//<><><><><>//***